८

अट्ठमो पाढो

# असोगराइणो बारहमो पत्थरलेहो

भारताच्या प्राचीन इतिहासात मौर्य सम्राट अशोकाचे स्थान (इ. स. पू. तिसरे शतक) अद्वितीय असे आहे. अशोकाच्या शिलालेखांपासून भारतीय इतिहासाचे सुवर्णयुग सुरू झाले. भारताच्या चारही टोकांस त्याचे लेख (शिलालेख) सापडल्यामुळे त्याच्या राज्याचा विस्तार संपूर्ण भारतभर होता. एकूण सहा ठिकाणी हे शिलालेख असून, त्या प्रत्येकात सामान्यत: चौदा राजाज्ञा कोरलेल्या आहेत. त्यापैकी गिरनारच्या शिलालेखातील बारावा शिलालेख प्रस्तुत पाठासाठी निवडला आहे. सध्याच्या काठेवाडमधील जुनागढपासून पूर्वेस दीड कि. मी. अंतरावर गिरनार पर्वताजवळ एक मोठी शिळा आहे. त्यावर सम्राट अशोकाच्या चौदा राजाज्ञा ब्राह्मी लिपीत कोरलेल्या आहेत. यातील भाषा प्राकृत असून ती पाली भाषेच्या जवळची आहे.

शिक्षक आणि विद्यार्थी दोघांच्या सोयीसाठी या पाठातील बाराव्या शिलालेखाचा मराठीत अर्थ दिला असून, विवेचक टीपाही पाठाच्या अखेरीस दिल्या आहेत त्यातून राजाचे व समाजाचे धार्मिक संबंध कसे असले पाहिजेत ते स्पष्ट होते.

---

१. देवानं पिये पियदसि राजा सवपासंडानि च पवजितानि च घरस्तानि च पूजयति दानेन च विवाधाय च पूजाय पूजयति ने (१)

२. न तु तथा दानं व पूजा व देवानं पियो मंञते यथा किती सारवढी अस सवपासंडानं (२) सारवढी तु बहुविधा (३)

३. तस तु इदं मूलं य वचगुती किंती आत्पपासंडपूजा व परपासंडगरहा व नो भवे अप्रकरणम्हि लहुका व अस

४. तम्हि तम्हि प्रकरणे (४) पूजेतया तु एव परपासंडा तेन तन प्रकरणेन । एवं करु आत्मपासंडं च वढयति परपासंड च उपकरोति (५)

५. तदंञथा करोतो आत्पपासंड च छणति परपासंडस च पि अपकरोति (६) यो हि कोचि आत्पपासंडं च पूजयति परपासंडं व गरहति

६. सवं आत्पपासंडभतिया किंति आत्पपासंडं दीपयेम इति सो च पुन तथा करातो आत्मपासंडं बाढतरं उपहनाति (७) त समवायो एव साधु

७. किंति अञमंञस धंमं स्रुणारु च सुसुंसेर च (८) एवं हि देवानंपियस इछा किंति सवपासंडा बहुस्रुता च असुकलाणागमा च असु (९)

८. ये च तत्र तत प्रसंना तेहि वतव्यं (१०) देवानंपियो नो तथा दानं व पूजां व मंञते यथा किंति सारवढी अस सर्वपासडानं (११) बहका च एताय

९. अथा व्यापता धंममहामाता च इथीझखमहामाता च वचभूमीका च अञे च निकाया (१२) अयं च एतस फल य आत्पपासंडवढी च होति धंमस च दीपना (१३)

---

## शब्दार्थ व टीपा

**सवपासंड** - सर्वपार्षद, सर्व धर्मसंप्रदाय.
**पवजितानि** - प्रव्रजित, संन्यासी.
**घरस्तानि** - गृहस्थ, गृहस्थाश्रमी, संसारी लोक.
**विवाधाय** - विविध प्रकारचे.
**मंञते** - मानतो, महत्त्व देतो.
**सारवढी/सारवडी** - सारवृद्धी, भरभराट.

**वचिगुती** – बोलण्यातील संयम.
**आत्पपासंडपूजा** – आत्मपार्षदपूजा, स्वधर्मपूजा.
**परपासंडगरहा** – परधर्माची निंदा.
**अप्रकरणम्हि** – अप्रासंगिक, प्रसंग नसताना.
**लहुका** – लघुका, संयमित.
**प्रकरणे** – प्रसंगांमध्ये.
**वढयति** – वर्धयति, वृद्धी करतो.
**तदंञथा** – ह्याच्या विरुद्ध.
**छणति** – हानी करतो.
**गरहति** – निंदा करतो.
**आत्पपासंडभतिया** – स्वधर्मावरील भक्तीने.
**दीपयेम** – 'उज्ज्वल करू' या इच्छेने.
**बाढतरं** – अधिक, जास्त.
**उपहनाति** – हानी करतो.
**अञमंञस** – अन्यमन्य, एकमेकांची, परस्पर.
**स्रुणारु** – ऐकावेत.
**सुसुंसेर** – आचरणात आणावेत.
**बहुस्रुता** – बहुश्रुत.
**कलाणगामा** – कल्याणकारी.
**असु** – असावेत.
**प्रसंना** – प्रसन्न, भक्तियुक्त.
**वतव्यं** – व्यक्त करावे, मागावे.
**धंममहामाता** – धर्म-महामात्र, धार्मिक अधिकारी.
**इथी-झख-महामाता** – स्त्री-अध्यक्ष-महामात्र, महामात्र म्हणून नेमलेली महिला.
**वचभूमिका** – व्रजभूमीका.
(धर्ममहामात्र, स्त्री-अध्यक्ष-महामात्र आणि व्रजभूमीक- ही तीन अधिकारपदे अशोकाने उत्तम राज्यशासनासाठी निर्माण केली होती. त्यांच्या माध्यमातून राज्यशासन चालत असे.)

## गिरनारच्या बाराव्या लेखाचा सुलभ मराठी अनुवाद :

**(मूळ उताऱ्यात (१), (२) - असे आकडे जेथे दिले आहेत, तेथे अर्थाच्या दृष्टीने वाक्य पूर्ण होते. त्याप्रमाणे अनुवाद दिला आहे.)**

(१) देवांचा लाडका प्रियदर्शी राजा सर्व धर्मसंप्रदाय, संन्यासी आणि गृहस्थाश्रमी लोकांचा दान देऊन आणि विविध प्रकारचे सन्मान देऊन, मानमरातब राखतो.
(२) देवांचा लाडका राजा, दान आणि सन्मान यापेक्षा सर्व संप्रदायांच्या तत्त्वप्रणालींच्या अर्थपूर्ण वृद्धीला जास्त महत्त्व देतो.
(३) ही सारवृद्धी निरनिराळ्या अंगांनी होते.
(४) वाचेचा संयम हे त्याचे मूळ आहे. स्वधर्मस्तुती आणि परधर्मनिंदा अप्रासंगिक असू नयेत आणि त्याही
(५) त्या त्या वेळी संयमित असाव्यात.
(६) प्रत्येक वेळी दुसऱ्या संप्रदायांचा यथायोग्य सन्मान केला पाहिजे.
(७) अशा तऱ्हेने वागणूक करणारा मनुष्य आपल्या धर्माची वृद्धी करतो आणि दुसऱ्या धर्मांना उपकृत करतो.
(८) याच्या विपरीत वागणारा आपल्या संप्रदायाचे नुकसान करतो आणि दुसऱ्या संप्रदायांवर अन्याय करतो.
(९) आपला संप्रदाय उज्ज्वल करण्याच्या इच्छेने आणि त्यावरील भक्तीने जो स्वधर्मस्तुती आणि परधर्मनिंदा करतो, तो स्वधर्माचीच जास्त हानी करतो.
(१०) म्हणून समन्वय योग्य आहे.
(११) म्हणून परस्परांची धर्मतत्त्वे ऐकावीत व त्यांचे पालन करावे. सर्व धर्मसंप्रदाय बहुश्रुत आणि कल्याणकारी सिद्धांतांचे असावेत अशीच देवांच्या लाडक्या राजाची इच्छा आहे. ज्याची आपल्या संप्रदायावर भक्ती आहे त्याने असे सांगावे.
(१२) देवांचा लाडका राजा सर्वसंप्रदायांच्या तत्त्ववृद्धीला, दान आणि पूजा यांपेक्षा जास्त महत्त्व देतो.
(१३) या कारणास्तव धर्ममहामात्र, स्त्री-अध्यक्ष-महामात्र आणि व्रजभूमीक असे निरनिराळे अधिकारी नेमलेले आहेत.

**विशेष टीप :**

सम्राट अशोकाने राज्याभिषेकानंतर बारा वर्षांनी प्रजेच्या सुखासाठी आणि हितासाठी धर्माज्ञा कोरविल्या. प्रस्तरांवर कोरून ठेवल्याने त्या अजरामर झाल्या. प्रस्तुत लेखात सम्राट अशोकाच्या सर्वधर्मसमभावाची झलक स्पष्टपणे दिसते. व्यक्तिस्वातंत्र्य, धार्मिक स्वातंत्र्य आणि सहिष्णुतेचा तो पुरस्कर्ता होता. 'स्त्री-अध्यक्ष-महामात्रां'ची नेमणूक सम्राट अशोकाच्या स्त्री-पुरुष-समानतेच्या दृष्टिकोणाचे द्योतक मानावयास हवी.

## स्वाध्याय

**प्र. १ : थोडक्यात उत्तरे लिहा.**

(१) प्रियदर्शी राजा धार्मिक संप्रदायांचा सन्मान कसा करत होता ?

(२) धर्माची सारवृद्धी कशा प्रकारे होते ?

(३) संप्रदायाची हानी कशामुळे होते ?

(४) संप्रदायांच्या सारवृद्धीसाठी प्रियदर्शी राजाने कोणता अधिकारीवर्ग नियुक्त केला होता ?

**प्र. २ :** या पाठाचा सारांश सुमारे २० ओळीत लिहा.

## विशेष अभ्यास

शिक्षकांच्या मदतीने 'सम्राट अशोक' - या विषयावर सचित्र प्रकल्प तयार करा.

❑ ❑ ❑